आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
३० ऑगस्ट २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- मराठवाड्यातल्या मराठा समाजातल्या उर्वरित नागरिकांना लगेच कुणबी प्रमाणपत्र देण्याचा मनोज जरांगे पाटील यांचा आग्रह, संवैधानिक चौकटीत राहून तोडगा काढण्याचा मुख्यमंत्र्यांचा पुनरुच्चार

- केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्याकडून मुंबईत तर जे. पी. नड्डा यांच्याकडून पुण्यात गणपती दर्शन

- २५व्या शांघाय सहकार्य संस्थेच्या शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी चीनमध्ये दाखल

आणि

- बीड जिल्ह्यात पेंडगाव इथं रस्ता अपघातात सहा जणांचा मृत्यू

**<><><><>**

मराठवाड्यातला मराठा हा कुणबीच असून उद्यापासून मराठा समाजातल्या उर्वरीत नागरिकांना कुणबी प्रमाणपत्राचं वाटप करावं अशी भूमिका मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आज मांड़ली. मराठा आरक्षण विषयक समितीचे अध्यक्ष निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती संदीप शिंदे यांनी आज मुंबईच्या आझाद मैदानात उपोषणाला बसलेले मनोज जरांगे यांची भेट घेऊन चर्चा केली, त्यावेळी जरांगे बोलत होते. या आंदोलनाविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

- **- होल्ड व्हाइस कास्ट - -**

मनोज जरांगे यांच्या उपोषणाचा आज दुसरा दिवस आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी हजारो कार्यकर्ते मुंबईत दाखल झाले. शिंदे समितीनं आज यासंदर्भात जरांगे पाटील यांच्याशी चर्चा केली. यावेळी मराठा समाजातल्या उर्वरित नागरिकांना कुणबी प्रमाणपत्र द्यायला सहा महिन्यांची मुदत हवी असं न्यायमूर्ती शिंदे यांनी जरांगे यांना सांगितलं. मात्र शिंदे समितीने तेरा महिने यावर अभ्यास केला आहे, त्यामुळे कुणबी प्रमाणपत्रांचा निर्णय तातडीनं लागू करावा, सातारा आणि हैदराबाद गॅझेटियरमधल्या नोंदी

तातडीने स्वीकाराव्यात, असा आग्रह जरांगे यांनी धरला. तसंच औंध आणि बॉम्बे गॅझेटियर दोन महिन्यात लागू करावा अशी मागणी त्यांनी केली. मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मृत्यू झालेल्या आंदोलकांच्या वारसांना तातडीनं १० लाख रुपये आणि नोकरी द्यायची मागणीही जरांगे यांनी लावून धरली आणि उपोषण मागे घ्यायला नकार दिला.

मंत्रिमंडळानं हैदराबाद गॅझेटसह काही गोष्टींना तत्त्वतः मान्यता दिल्याची माहिती न्यायमूर्ती शिंदे यांनी दिली. राज्यभरातून कुणबी प्रमाणपत्रासाठी ५८ लाख अर्ज प्राप्त झाले असून यापैकी दहा लाख जणांना कुणबी प्रमाणपत्र दिलं आहे. जातीचं प्रमाणपत्र व्यक्तिला दिलं जातं समुहाला नाही, असं शिंदे यांनी जरांगे यांना कळवलं. या चर्चेदरम्यान जरांगे यांचं काही प्रमाणात समाधान झालं असून इतर मुद्द्यांवर त्यांचं म्हणणं मंत्रिमंडळासमोर मांडू, अंतिम निर्णय तिथं घेतला जाईल, असंही न्यायमूर्ती शिंदे यांनी स्पष्ट केलं.

दरम्यान, निर्णय घेण्याचा अधिकार न्यायमूर्ती शिंदे यांना नाही, तरी सरकारने त्यांना चर्चा करण्यासाठी पाठवल्याबद्दल जरांगे यांनी नाराजी व्यक्त केली.

**<><><><>**

तालुकास्तरावर तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली गठीत वंशावळ समितीला शासनानं ३० जून २०२६ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागानं जारी केला, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी आज मुंबईत वार्ताहरांशी बोलतांना ही माहिती दिली. सदर समितीस २५ जानेवारी २०२४ रोजीच्या शासन निर्णयातील सर्व तरतूदी लागू राहतील, असं शासन निर्णयात नमूद करण्यात आलं असल्याचंही शिरसाट यांनी सांगितलं.

**<><><><>**

मराठा आरक्षण प्रश्नावर सरकार संवैधानिक चौकटीत राहून तोडगा काढू असा पुनरुच्चार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.

आऱक्षणाचा प्रश्न राष्ट्रीय पातळीवर नेऊन त्यासाठी संविधानात सुधारणा करायला हवी या मागणीचा पुनरुच्चार ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केला. तामिळनाडूमधे आरक्षणाची मर्यादा ७२ टक्के असण्याकडे लक्ष वेधत पवार यांनी आऱक्षणाची मर्यादा वाढवणं गरजेचं असल्याचं म्हटलं.

यावर शरद पवार आज ही सूचना करत आहेत, मात्र ते दहा वर्षे सत्तेत होते, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

<><><><>

आझाद मैदानावरील मराठा आरक्षण आंदोलकांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. आझाद मैदान आणि परिसरातील पैसे द्या आणि वापरा तत्वावरील तसंच इतर सार्वजनिक शौचालयं आंदोलकांच्या वापरसाठी मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहेत. मैदानाच्या आतल्या बाजूस एकूण २९ शौचकूप असणारं शौचालय, महात्मा गांधी मार्गावर प्रत्येकी १० शौचकुपं असलेली ३ फिरती शौचालयं, मेट्रो साइट शेजारी १२ फिरती शौचालयं, तसंच, फॅशन स्ट्रीट पदपथ आणि आजूबाजूच्या परिसरात २५० शौचकूप असणारी फिरती शौचालयं विनामूल्य वापरासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

<><><><>

जरांगे यांच्या दबावापुढे ओबीसी झुकणार नाहीत, असं ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी म्हटलं आहे. हे उपोषण ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणासाठी असून मराठा आरक्षणाची पूर्तता करताना ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही अशी लेखी हमी सरकारकडून मिळाल्याशिवाय उपोषण मागे घेणार नाही, असं ते म्हणाले.

<><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज मुंबईत विविध ठिकाणी गणपतीचं दर्शन घेतलं. सकाळी त्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा या निवासस्थानी गणेशाचं दर्शन घेतलं. त्यानंतर त्यांनी सह्याद्री अतिथीगृहात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर व्यापक चर्चा केली. त्यानंतर शहा यांनी लालबागच्या राजाचं आणि वांद्रे इथल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या गणेश मूर्तीचं सहकुटुंब दर्शन घेतलं.

<><><><>

केंद्रीय आरोग्य मंत्री आणि भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी आज पुण्याचं ग्रामदैवत कसबा गणपती आणि श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतींचं दर्शन घेतलं आणि पूजा केली. सदाशिव पेठेतलं साने गुरुजी तरुण मंडळ, तसंच कोथरूडच्या श्री साई मित्र मंडळाच्या गणरायाचंही नड्डा यांनी दर्शन घेतलं आणि आशीर्वाद घेतले.

**<><><><>**

२५व्या शांघाय सहकार्य संस्थेच्या शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज चीनच्या तियानजिन इथं पोहोचले. ही शिखर परिषद उद्या सुरू होईल. या परिषदेत प्रधानमंत्री जागतिक नेत्यांशी स्थानिक सुरक्षा, कनेक्टिव्हिटी, शाश्वत विकास, जागतिक सहकार्य यासह विविध विषयांवर चर्चा करणार आहेत. शांघाय सहकार्य संस्थेच्या २५ वर्षांच्या प्रवासाचा आढावा, तसंच १० वर्षांच्या विकास धोरणावरही या परिषदेत चर्चा होईल. २० देशांचे प्रमुख आणि १० आंतरराष्ट्रीय संघटनांचे नेते या परिषदेसाठी चीनला आले आहेत.

**<><><><>**

चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत देशाच्या आर्थिक विकासदरात ७ पूर्णांक ८ टक्के वाढ झाल्याबद्दल तज्ज्ञांनी समाधान व्यक्त केलं आहे.

पहिल्या तिमाहीत दर्शवलेल्या मजबूत आणि स्थिर वाढीला प्रभावी धोरण आणि देशांतर्गत बाजारपेठेतील वाढती मागणी कारणीभूत ठरत असल्याचं असोचेमचे अध्यक्ष संजय नायर यांनी म्हटलं आहे.

देश जागतिक स्तरावर अनेक अडचणींचा सामना करत असताना अर्थव्यवस्थेचा विकास होत असल्याचं फिक्कीच्या महासंचालक ज्योती विज यांनी म्हटलं आहे.

याविषयी आर्थिक विश्लेषक उदय तारदाळकर म्हणाले.

\- **- -होल्ड - बाईट - -** +41

भारताची अर्थव्यवस्था केवळ जगात वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था नसून जीडीपीत झालेली वाढ उल्लेखनीय असल्याचं केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी म्हटलं आहे. तर, सुधारणा आणि लवचिकतेच्या बळावर जागतिक स्तरावर भारताच्या अर्थव्यवस्थेनं वेग पकडला असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

राज्यात परवान्याशिवाय अनधिकृत बाईक टॅक्सी सेवा सुरू असलेल्या रॅपिडो, ओला, उबर या सारख्या कंपन्यांवर मोटार परिवहन विभागामार्फत सातत्यानं कारवाई सुरू राहील, असं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी म्हटलं आहे. राज्य शासनानं ई-बाईक

टॅक्सी धोरण निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू केली असून त्यानुसार संबंधित संस्थांनी परवाने काढून आपली ई -बाईक टॅक्सी सेवा सुरू करावी असं आवाहनही त्यांनी केलं आहे.

<><><><>

बीड जिल्ह्यात धुळे-सोलापूर महामार्गावर पेंडगाव इथं आज सकाळी झालेल्या रस्ते अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला. मृत व्यक्ती पेंडगावला दर्शनासाठी जात असताना भरधाव कंटेनरने त्यांना धडक दिल्यानं हा अपघात झाला. या घटनेची सखोल चौकशी करण्याचे निर्देश पोलिसांना दिल्याचं उपमुख्यमंत्री आणि बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी वार्ताहरांना सांगितलं. तसंच मृतांच्या कुटुंबांना आवश्यक मदत दिली जाईल असं आश्वासनही पवार यांनी दिलं.

<><><><>

बीड जिल्ह्यातल्या संतोष देशमुख हत्येप्रकरणी आरोपी वाल्मिक कराडच्या जामीन अर्जावरचा निकाल न्यायालयाने राखून ठेवला असून पुढची सुनावणी येत्या १० सप्टेंबरला ठेवली आहे. दुसरा आरोपी विष्णू चाटे याच्या दोषमुक्ती अर्जावरचा निकालही न्यायालयाने राखून ठेवला आहे.

<><><><>

हवामान विभागाने रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग, सातारा आणि कोल्हापुर तसंच नाशिकमधल्या घाट परिसराला आज मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. मुंबई, पुणे, पालघर, ठाणे जिल्ह्यासह, उत्तर मराठवाडा आणि विदर्भाला यलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागात विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

//<><><><>//